नियमित फौजदारी खटला क्र.१६५/२०२२
निशाणी क्र.३६

सरकारतर्फे साक्षीदार क्र.३ चा सरतपासः-
मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,
माझे नावः - पो. कॉ./२५१० गणेश लक्ष्मण इथापे ,
वय - ३५ वर्षे, धंदा - नोकरी,
नेमणूक - श्रीरामपुर शहर पोलीस स्टेशन.
अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती एम.के.सोनवणे यांचे मार्फत सुरुः-

दिनांक १६/०७/२०२१ रोजी मी नेवासा पोलिस स्टेशनला पोलिस शिपाई म्हणून कार्यरत होतो. सदर दिवशी माझी तपास पथक म्हणून डयुटी होती. आम्ही पोलिस स्टेशनला हजर असताना पो.नि. क-हे साहेब यांनी मला व पो.कॉ गुंजाळ यांना बोलावून सांगितले की, त्यांना गुप्त बातमीदारांमार्फत बातमी मिळाली आहे की, घोगरगाव शिवारात महादेव मंदीराजवळ गोदावरी नदीच्या पात्रात एक इसम आप्पासाहेब उर्फ गणेश बाळासाहेब कोकणे, रा. टाकळीभान, ता. श्रीरामपुर हा विनापरवाना वाळुची वाहतुक करत आहे, तरी तुम्ही तिथे जावून खात्री करा. त्यानंतर मी व पो. कॉ. गुजांळ खाजगी वाहनाने नमुद ठिकाणी सायंकाळी १९.०० वाजता तिथे गेलो असता, गोदावरी नदी पात्रात स्वराज कंपनीचा ट्रॅक्टर क्रमांक एम एच १७ व्ही ८५८७ व त्यास जोडलेली विना नंबरची भगव्या रंगाची ट्रॉलीमध्ये काही इसम विनापरवाना बेकायदा वाळुची उत्खनन करुन अंदाजे अर्धा ब्रास वाळुची चोरी करताना मिळुन आला. सदर आरोपीस ताब्यात घेवून कारवाईसाठी घोगरगाव गावचे तलाठी राहुल साठे यांच्या ताब्यात दिली. त्यानंतर तलाठी भाऊसाहेब यांनी गुन्हा दाखल केला. आरोपीला पाहिल्यास ओळखु शकतो. आरोपी आज रोजी न्यायालयात हजर नाही.

सरतपास पुर्ण

उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ के.बी. शिंदे यांचेमार्फत सुरु-

२. आम्ही ज्या खाजगी वाहनाने गेलो त्याची नोंद स्टेशनला डायरीला घेतली नाही. हे म्हणणे खरे नाही की, ट्रॅक्टर आरोपीच्या शेतात उभा होता. ट्रॅक्टर जिथे उभा होता तेथील आजूबाजूच्या शेती कोणाच्या होत्या हे मी पाहिले नाही. मी खड्डयाचे मोजमाप केले नाही. पोलिसांनी वाहन पकडल्यास तलाठी फिर्याद देत असतात, त्यामुळे मी फिर्याद दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळी गेलो नाही, केवळ तलाठी यांना सहकार्य व्हावे म्हणून मी खोटा जबाब देत आहे.

उलटतपास पुर्ण. फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती,
सही/-
(ए.एन.सरक)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.३,
नेवासा.

दिनांक- ०९/१२/२०२५.